ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# औरंगपुरचा इतिहास

प्रा. निळे एस. जी.
पद्मश्री विरळे महाविदयालय प्रवरानगर लोणी खुर्द ता. राहता जि. अ. नगर सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ

शिर्षक : स्थानिक इतिहास : औरंगपुर गावाचा इतिहास.



## प्रास्तावीक :-

राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत २००९-१० या वर्षात पद्मश्री विखे पाटील कॉलेज चा कॅम्प औरंगपुर या गावी घेण्यात आला. या योजने अंतर्गत औरंगपुर गावाचा इतिहास लिहीण्याचे काम हाती घेण्यात आले. त्यासाठी सर्वेक्षण, मुलाखती, प्रत्यक्ष पाहणी व फोटोग्राफी करण्यात आली व नंतर इतिहास लिहीण्याचे काम हाती घेण्यात आले. या कामी विजय कावळेराम डेंगळे, दशरथ शंकर तळोले यांची मदत झाली. याच बरोबर एन. एस. एस. योजनेतील विद्यार्थ्यांची ही या कामी सर्वेक्षणसाठी मदत झाली. एन. एस. एस. आधिकारी प्रा. बाळासाहेब गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. स्वत: ते या कामात गढून गेले. या सर्वाचा सहकार्याने हा इतिहास पुर्ण होवू शकला आहे.

औरंगपुर या गावात १९८४-८५ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचा कॅम्प झाला होता. तेव्हा पासून आजपर्यंत टप्प्याटप्प्याने या गावाचा विकास झाला आहे. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचा मोठा हातभार लागला आहे.

## भौगोलिक स्थान : -

महाराष्ट्रातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठ्या असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील कोल्हार-घोटी महामार्ग क्र. ४४ लोणी पासुन संगमनेर कडे सात कि. मी. अंतरावर औरंपुर फाटा आहे. व या फाट्या पासून उत्तरेस दीड कि. मी. अंतरावर हे गाव आहे.

## ऐतिहासिक पार्श्वभमी : -

प्राचीन काळात अहमदनगर जिल्ह्याचा परिसर दंडकारण्याचा प्रदेश होता. मध्ययुगीन कालखंडात हा परिसर बहामनी साम्राज्यात होता. व पुढे निजामशाहीचे राज्य या प्रदेशावर होते. पुढे मराठी राज्यात यांचा समावेश झाला. पेशवाईच्या काळात हा प्रदेश होळकरांच्या सरंजाममध्ये येत होता. तर त्रिंबकजी डेंगळे यांच्या जहागिरीचा होता.

पेशवाईच्या काळात या गावास जाळीची वाडी म्हणून ओळखले जात होते. सुरुवातीस शेती कसण्यासाठी शेतात बापू शाबा तळोले रहावयास आले. आणि त्यानंतर एक एक कुटुंब रहावयास येवून मोठी लोक वस्ती निर्माण झाली यावेळी जाळीची वाडी म्हणून त्यास ओळखले जावू लागले.

## औरंगपुर हे नाव गावास का देण्यात आले ?

औरंगपुर हे नाव जाळीच्या वाडीस नंतर देण्यात आले या पाठीमागे एक ऐतिहासीक कथा या गावातील लोक सांगतात. औरंगजेब बादशहा मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी दक्षिणेत आला असता. काही काळ त्यांची छावणी गोरक्षनाथ डोंगरावर होती. यावरुन या गावास औरंगपुर हे नाव दिले गेले. वास्तविक औरंगाबाद या शहराचे नाव देखील औरंगजेब बादशहाने काही काळ केलेल्या वास्तव्यावरुन देण्यात आले. तसेच अहमदनगर येथे औरंगजेब बादशहा मुक्कामी असताना जेथे त्याची छावणी होती. व जेथे त्याचा मृत्यू झाला त्या ठिकाणाला औरंगपुरा हे नाव दिलेले आहे. या दाखल्या वरुन औरंगपुर गावाविषयी गावक-यांनी सांगितलेली कथा सत्य असल्याचे दिसते.

औरंगपुर गावाच्या आजूबाजूस चिंचपूर, मिरपूर, लव्हारे, गोगलगाव, सादतपूर, दुर्गापूर, हसनापूर, चंद्रापूर अशी गावे आहेत. या गावाच्या नावत पूर हा शब्द आहे. त्यावरुन पूर हा शब्द औरंगनावापुढे लावून औरंगपूर हे नाव झाले असावे. प्राचीन काळात पौर हा शब्द नगरचा प्रमुख अधिकारी या अर्थाने वापरला जाई. त्यावरून पूर हा शब्द नगर या अर्थाने वापरला जात असावा.

## औरंगपुर गावातील पुरातन ऐतिहासिक वास्तू : -

### १. पाणी पुरवठा टाकीजवळील पुरातन ऐतीहासिक बारव : -

औरंगपुरगावात दोन पुरातन बारव आहे. एक बारव पाणीपुरवठा योजनेच्या पाण्याच्या टाकी जवळ आहे तर दुसरी बारव जिल्हा परिषदेच्या शाळेजवळ आहे. पाण्याच्या टाकी जवळील बारव चुना वाळू आणि दगड वापरुन बांधलेली आढळते. बारवेतून पाणी काढण्यासाठी मोट वापरली जात होती . मोट चालविण्यासाठी आवश्यक बांधकाम देखील मोट चालविण्यासाठी बारवेच्या वर लांब दगड बसविलेले असून त्या दगडाना गोलाकार छिद्र केलेले आहे. या छिद्रातून दोर ओवला जात व मोटेच्या साहय्याने पाणी वर काढले जात. आनंदगीर गोसावी मोट हाकण्याचे काम करत होते. व हनुमान मंदीरात रोज दिवा लावीत होते. त्याच्या मृत्यूनंतर त्यांची समाधी या बार व`च्या बाजूला बांधलेली आहेत. तेथे आणखी पाच समाध्या गोसावी वंशजाच्या आहेत. बारखेच्या चारही बाजूस जमीनीवर दगड एकास एक लागून बांधलेली लांदी आहे. त्याचा वापर कपडे धुण्यासाठी केला जात होता.

### जि. प. शाळे जवळील बार व : -



जिल्हा परिषदे शाळेजवळ एक दुसरी बार व आहे. तेथे बार वे च्या बाजूस दगडाची एकास एक लागून लादी बनविलेली आहे. बार व चे बांधकाम चुना वाळू व दगड वापरुन केलेले आहे. या दोन्ही बार व`च्या बांधकामातील दगड जिर्ण झाले असावे. यावरुन त्याचे बांधकाम २०० ते २५० वर्षा पुर्वी झालेले असावे. आजही या दोन बार व ात पाणी आहे. परंतु ते पाणी वापरण्यास चांगले नसल्याने त्याचा कोणी वापर करीत नाही.

### मन्याबाईचा बार व : -





गावाच्या उत्तरेस गावा पासून एक कि. मि. अंतरावर एक चौरस बार व आहे. ही बार व घडीव दगडात बांधलेली आहे. मल्हारराव होळकराच्या संरजामाता हे गाव येत होते त्यावेळी होळकर शैली वापरुन ही बार व बनविलेली दिसते. बांधकामासाठी घडीव दगड, चुना, व वाळू यांचा वापर केलेला आहे. ही बार व आठ बाय आठ चौरस असून खाली उतरण्यासाठी पाय-या बांधलेल्या आहे. तरीही बार व`चा वरील १२ फुट भाग जसाच्या तसा आहे. त्या काळातील त्या बार व`चे बांधकाम चौरस व रेखीव असल्याचे दिसते. या बार व`ला मन्याबाईची बार व म्हणून ओळखले जाते. गावाक-यांच्या मते ही बार व आहिल्याबाई होळकरांच्या काळातील आहे.

### शनीचा डोंगर / गोरक्षनाथाचा डोंगर : -



गावाच्या उत्तरेस डोंगर आहे. या डोंगराबद्यल आख्यायीका गावक-यात रुढ आहे. डोंगरावर शंकराचे पुरातन मंदीर आहे या जागी गोरक्षनाथांनी ६ महीने तपश्चर्या केली होती म्हणून या डोंगराला गोरक्षनाथाचा डोंगर म्हटले जाते. तसेच शंकराच्या मंदीरासमोर नंदी आहे. त्या पाठीमागे एक चौथरा असून चौथ-यावर गरुडावर बसलेल्या शनी देवाची मुर्ती आहे बाजूला एक मोठी शिळा आहे. गावकरी मोठ्या श्रध्देने पुजा करतात.



शनीच्या मुर्ती पासून पूर्व बाजूस काही अंतरावर एक टाक आहे. तिन बाय सात फुट असा खड्डा काळ्या पाशाणात खोदलेला आहे. त्यात नेहमी पाणी असते. तो साधारण चार ते साडेचार फुट खोल असावा. या टाकाला शनीचे तळे म्हणून गावकरी ओळखतात. खरुज, नायटा, झाला तर या तळ्यात अंघोळ केली असता सर्व रोगराई नष्ट होते. असा गावक-यामध्ये समज आहे.



शनी डोंगरावर जाण्यासाठी मार्ग नव्हता त्यावेळी डोंगरावर जाताना डोंगर फोडून जागोजागी पाय-या बनविल्या होत्या परंतु तेथे वर चढताना दगडांना धरुनच वर जावे लागत होते. गावक-यांच्या मागणीवरुन शिर्डी मतदार संघाचे आमदार शिक्षण मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपल्या आमदार निधीतून या डोंगरावर जाण्यासाठी २००८ २००९ मध्ये पाय-या बनविल्या त्यामुळे डोंगरावर गावक-यांना शनी देवाच्या व गोरक्षनाथाच्या दर्शनाला जाणे सुलभ झाले आहे. हा डोंगर पाच गावाच्या शिवेवर असल्याने पाच ही गावाचे लोक आपले दैवत मनातात. श्रावण महीन्यात येथे सप्ताह भरविला जातो. गोगलगाव, सादतपुर, लव्हारे, गोरक्षवाडी व औरंगपुर या गावातील लोक या सप्ताहात मोठ्या उत्साहाने सामील होतात. रोज भजन किर्तन केले जावून शेवटच्या दिवशी प्रसाद वाटला जातो व सप्ताहाची समाप्ती केली जाते.

### गऊळ वाडा (गवळी वाडा) : -



गावाच्या उत्तरेस असंलेल्या शनी डोंगराच्या दक्षिण बाजूस गऊळ वाडा होता. आज या ठिकाणी केवळ अवशेष उरलेले आहे. वाड्याच्या भितीचे दगड तसेच घराचे दगड या परिसरात विखुरलेले आहे. या ठिकाणी पुर्वी गवळी लोकांची वसाहत होती. औरंगजेब दक्षिणेत स्वारीवर आला असता त्याची छावणी या शनी डोंगरावर असताना त्याने गऊळ वाडा उध्वस्त केला.





तेथील लोकांची कत्तल केली. तर काही लोक पळून गेले. यावेळी औरंगजेबाने हा वाडा पाडला. आज या वाड्याचे अवशेष पहावयास मिळतात. पुर्वी वाड्याचे बांधकाम पांढ-या मातीने केले जात होते. आजही तेथे पांढरी माती व दगड पढून आहेत. तसेच धान्य व किमती वस्तू ठेवण्यासाठी जमीनीत खड्डे केलेले व त्याचे बांधकाम केलेले आजही या ठिकाणी पाहवयास मिळते या वाड्याविषयी गावात अनेक समज अपसमज प्रचलीत आहे.




औरंगपुर गाव पुर्वी निमगाव जाळीचा एक भाग समजला जाई त्याला जाळीची वाडी हे नाव होते. परंतु पुढे लोकवस्ती वाढल्याने या वाडीचे एक स्वतंत्र गाव तयार करावे अशी भूमीका गावक-यांनी घेतली. त्यावेळी **सावळेराम डेंगळ पाटील** यांनी पुढाकरार घेऊन १९५९ मध्ये ग्रामपंचायत वेगळी केली तेव्हा पासून ते १६ वर्ष सरपंच म्हणून काम पाहत होते.

### जिल्हा परिषदेच्या प्राथमीक शाळेची स्थापना : -

१९६१ मध्ये (२ जोनेवारी) जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा सुरु केली. १९६३ मध्ये **शंकराव चव्हान** यांच्या हस्ते शाळेच्या इमारतीचे उद्घाटन झाले.

### शेतीसाठी पाणी पुरवठा योजना : -

१९७२ मध्ये **खताळ पाटील** मंत्री असताना ९५ हेक्टरच्या क्षेत्रासाठी शेतीला पाणीपुरवठा मंजुर झाला. १९७२ ते ७५ या काळात पाणी आडवा व पाणी जिरवा मोहीम राबविली. यासाठी गावाच्या उत्तरेस शनी डोंगरावरुन येणारे पाणी आडविण्यासाठी बांध घातले गेले. १९९१ मध्ये आडवे नाले तयार करण्यात आले.

### पाणी आडवा पाणी जिरवा मोहीमः -



१९९१ मध्ये प्रा.बी.एस.लोखंडे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम आधिकारी असतांना राष्ट्रीय सेवा योजनेने श्रमदानातून नाल्यावर बंधारा बांधला १९९५ ते ९९ या काळात प्रवरा सहकारी साखर कारखान्यामार्फत बांध घातले गेले व शेतक-याला शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिले. या वेळी फादर खान नावाचे अधिकारी होते त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण झाले.

### विज पुरवठा : -

श्री.विठ्ठल नाना तळोले सरपंच असताना १९८६-८७ मध्ये त्यांनी गावात विज पुरवठा जोडून घेतला.

### टेलिफोन सेवा : -



१९९९-९२ मध्ये **दत्तात्रय पाटील तरोळे** यांनी सरपंच असताना टेलिफोन दुर संचार निगम खात्याचे केंद्रिय मंत्री **प्रमोद महाजन** यांची भेट घेऊन औरंगपुरमध्ये टेलिफोन सेवेची सुरवात करुन घेतली.

**पाणी पुरवठ्यासाठी नळ योजना : -**

१९९५ मध्ये अहमदनगर जिल्ह्याचे पालक मंत्री **श्री. राधाकृष्ण विखे पाटील** असताना नळ योजना औरंगपुरसाठी मंजुर झ ाली. पाणी पुरवठ्यासाठी पुर्ण सहा महिन्यात टाकी बांधून पुर्ण केली.

**घरकुल योजना : -** १९९१ ते २००० च्या काळात ७ घरकुले बांधून दिली गेली.

**विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी : -**

गावामध्ये १९६१ मध्ये विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची स्थापना ह झाली. या सोसायटी अंर्तगत राशन दुकान, रॉकेल डेपो, खतडेपो, या योजना चालविल्या जातात. या सोसायटीला शासनामार्फत बँकेकडून कर्जपुरवठा केला जातो. सध्या या सोसायटीचे चेअरमन **दत्तात्रय विठ्ठलराव तळोले** हे आहे. तर उपचेअरमन **भास्कर नाना तांबे** हे आहे.

**दुध संकलन केंद्रे : -**

१९९१ मध्ये दोन दुध डेअ-याची स्थापना झाली. त्यातील गोरक्षनाथ दुध संकलन केंद्र या डेअरीचे चेअरमन **लक्ष्मन गंगाधर डेंगळे पाटील** हे आहे तर सकाळ संध्याकाळ १००० लिटर दुध संकलन होत असते. २००४-०५ मध्ये चार बचत गट स्थापन झाले आहे. यात गावातील अनेक महीला व पुरुष सद्स्य आहे.

**शेतक-यांच्या आत्माहत्याविरोधी आंदोलन : -**

१९९१ मध्ये **विजय तळोले** ह शेतकरी सावकारी कर्जबाजारी झाले होते. म्हणून त्यांनी आत्महत्या केली. त्यावेळी गावाचे सरपंच **दत्तात्रय तळोले** यांनी हा प्रश्न सरकाकडे मांडण्यासाठी आंदोनल केले. लोकसभेत या प्रश्नाची चर्चा झाली. यावेळी १९९१ मध्ये **शरद पवार** विरोधी पक्ष नेते असतांना त्यांनी गावाला भेट दिली. यानंतर **गोपीनाथ मुंडे** सरकामध्ये असताना त्यांनीदेखील गावाला भेट दिली.

**गोरक्षनाथ फार्मस क्लब : -**

**विजय सावळेराम डेंगळे पाटील** यांनी गोरक्षनाथ फार्मस क्लब स्थापन केला. हा क्लब बाभळेश्वर कृषी विज्ञान केंद्रा अंर्तगत असून त्याचे १५ सदस्य आहे. या क्लबच्या माध्यमातून शेतजमीनीचे माती परिक्षण, पाणी परिक्षण हवामन अंदाज, बचतगट व बाजारभाव यांची माहीती शेतक-यांना पंरविली जाते. तसेच फळबागा व पशुपालन या विषयी मार्गदर्शन केले जाते.

**सिडा प्रकल्प : -**




औरंगपुर गावात प्रवरा मेडीकल ट्रस्ट्र मार्फत प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पा अंर्तगत गावातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. प्रत्येक महीन्याच्या पहील्या गुरवारी मोबाईल व्हॅन गावात येते. गावातील १ ते ३ वर्षा पर्यंतच्या विद्यार्थ्यांना घरी पोषण आहार उपलब्ध करुन दिला जातो. ३ ते ५ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांना शाळेत पोषण आहार उपलब्ध करुन दिला जातो. औरंगपुर गावात **सविता सुरेश डोळे** सिडा प्रकल्पाचे काम पाहतात.

## शिक्षण व्यवस्था : -

### प्राथमीक शाळा : -

१९६१ मध्ये जिल्हा परिषदेची प्राथमीक शाळा या गावात स्थापन झाली. १९६३ साली **शंकरराव चव्हानांच्या** हस्ते इमारतीचे उद्‌घाटन झाले. यावेळी दोन खोल्यांची शाळा बांधण्यात आली होती. या शाळेत १ ली ते ४ थी चे वर्ग भरविले जातात. सध्या येथे **संदिप बाबुराव जाधव** व **तिलोतमा शंकर सोनवणे** हे शिक्षक काम करत आहे. शाळेमध्ये शालेय पोषण आहार व सर्व मुलांना मोफत पाठपुस्तके या राज्यसरकारच्या योजना राबविल्या जातात. ग्रामपंचायत मार्फत गरीब विद्यार्थ्यांना व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना गणवेश दिला जातो. शाळेत निबंध स्पर्धा, वस्कृत्व स्पर्धा व भोजन या सारखे कार्यक्रम राबविले जातात. या शिवाय १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे महाराष्ट्रदिन शाळेत साजरे केले जातात. तसेच राष्ट्रीय महापुरुषाच्या जयंत्या व पुण्यातिथी साज-या केल्या जातात. शाळेच्या विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी नळ कनेक्शन, व मुतारी शैचालय उपलब्ध आहे. शाळेला खेळाचे मैदान मात्र उसध्या उपलब्ध नाही. नविन इमारत मंजूर झालेली असून सध्या काम सुरु आहे. मॉडेल स्कूल औरंगपुरसाठी मंजूर झालेले आहे. शाळेतील शिक्षकाकडे ग्रारमपंचायती मार्फत गावाचा सर्वे करण्याचे काम सोपविले जाते. ते काम शिक्षक चोखपणे बजावतात.

### आंगणवाडी : -

२ ऑक्टोबर १९८६ मध्ये आंगणवाडीची स्थापणा करण्यात आली. आंगणवाडी कार्यकर्ता म्हणून सध्या सौ. द्रौपती लक्ष्मण चोपडे व मदतनीस म्हणून रत्नप्रभा लक्ष्मण वाघचौरे काम पाहत आहे. ३ वर्षावरील मुलांना आंगणवाडीत दाखल केले जाते. ५ वर्षापर्यंत त्यांना आंगणवाडीत शिक्षण दिले जाते. ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलाच्या मातांना पोषण आहार व ७ महीने ते १ वर्ष वयाच्या मुलांना घरीच प्रोटाव्हीटा पावडर (सुकडी) चा पोषण आहार आंगणवाडी कार्यकर्त्या मार्फत पुरविला जातो. सध्या आंगणवाडीत शिकणा-या मुलांची संख्या ३२ आहे. तर प्राथमीक शाळेतील एकूण मुलांची संख्या ५० आहे. माध्यमीक तथा उच्च माध्यमीक शिक्षणाची सोय गावात नाही त्यासाठी तेथील मुले माध्यमिक व उच्च शिक्षण घेण्यासाठी लोणी या गावी जातात. ग्राम शिक्षण समिती गावातील शिक्षणासाठी कार्यरत आहेत. या स्कूल कमीटी सदस्य ९ आहेत तर त्याचे अध्यक्ष **दशरथ शंकर तळोले** हे आहेत.

## गावातील राजकीय परिस्थीती : -

औरंगपुर गावात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेना व कृषक समाज संघटनेचे कार्यकर्ते आहेत. वास्तविक काँग्रेस पक्षाला मानणा-या लोकांची संख्या आधिक आहे.

## औरंगपुर ग्रामपंचायत : -

१९५९ मध्ये **श्री सावळेराम डेंगळे पाटील** यांनी निमगावजाळीच्या ग्रामपंचायतीपासून औरंगपुर ग्रामपंचायत वेगळी केली यानंतर ते १५ वर्ष सरपंच होते. आज देखील काँग्रेस पक्षाची ग्रामपंचायत या भागात कार्यरत आहे. २००५ ते २०१० पर्यंत कालखंड आहे. सध्या **श्री. राम बबन वाकचौरे** गावचे सरपंच असून उपसरपंच **साहेबराव माधवराव तांबे** पाटील आहे. इतर सदस्य **लक्ष्मण गंगाधर डेंगळे, दशरथ शंकर तरोळे, सौ. नंदा राम वाकचौरे, सोमनाथ दत्तू माळी व सौ शारदा अशोक तांबे आहेत.** तर ग्रामसेवक म्हणून **विनायक नारायण कर्डक** काम करत आहे.

## पोलीस पाटील : -

गावातील तंटे सोडविण्यासाठी व व्यवस्था राखण्यसाठी पोलीस पाटल हे पद इंग्रजांच्या काळात निर्माण झाले. या आगोदर मध्ययुगात हे काम पाटील पाहत होते. परंतु नंतर हे काम पोलीस पाटलाकडे आले. भारत स्वातंत्र झाल्यानंतर त्या गावात पोलीस चौकी नाही तेथे पोलीस पाटील नेमले जात असत. सध्या हे काम **दत्तात्रय बाबुराव तळोले पाटील** हे पाहत आहेत.

## गावातील स्वातंत्र्य सैनीक : -

औरंगपुर गावात **चंद्रभान पाटीबा तळोले** व **काशीनाथ पाटीबा तळोले** हे दोन स्वातंत्र सैनीक आहे. त्यांनी १९६१ च्या गोवामुक्ती आंदोलनात भाग घेतला होता.

## गावातील न्याय व्यवस्था : -

औरंगपुर गाव जेव्हा जाळीची वाडी म्हणून ओळखले जाई त्यावेळी निमगाव जाळीच्या ग्रामपंचायती मार्फत न्याय निवाडा केला जात असत. जाळीच्या वाडीमध्ये **त्र्यंबकजी डेंगळे** यांचे वंशज **गणपतराव डेंगळे** राहवयास आले. त्यावेळी ३६ घोडे त्यांच्याकडे होते. शर्टला चांदीची बटने होती, पायात पैंजन घालत कानात पगरे तर हातात कडे असत अशा शाही थाट असलेले **गणपतराव डेंगळे** व **नाना बापू तळोले** हे दोन मिळून पाच गावचे न्याय निवाडे करीत होते. त्याचा त्या परिसरात मोठा दरारा होता. नंतर औरंगपुर ग्रामपंचायत वेगळी झाल्यानंतर हे काम ग्रामपंचायतीचे पंच व पोलीस पाटील मिळून करत असत. परंतु गंभीर समस्या असल्यास प्रकरण न्यायलयात तालुक्याच्या ठिकाणी जाते. व तेथे सरकारी न्यायालययामार्फत न्याय निवाडा होतो.

## ग्राम प्रशासन : -

१९५९ मध्ये ग्रामपंचायत वेगळी झाल्यानंतर या गावाचा विका स करण्यासाठी ग्राम पंचायत व गावकरी यांनी एकत्रीतरीत्या प्रयत्न केले. विविध विकासाच्या योजना राबविल्या. व औरंगपुर गावाचा कायापलट घडवून आणला आहे. औरंगपुर गावातील लोकांची दारीद्र्य रेषेची यादी नाही.

## निर्मल ग्राम पुरस्कार :-



औरंगपुर गावातील ग्रामस्थांनी गावाच्या विकासात हातभार लावला आहे. १०० टक्के हागणदारी मुक्त गाव बनविले व निर्मलग्राम पुरस्कार प्राप्त केला आहे. तसेच विमाग्राम देखील झालेले आहे.

घरकुल योजनेतून अद्याप पर्यंत ७ घरकुले आर्थिक दृष्ट्र्या गरिब लोकांना बांधुन दिले आहेत. गावात १२१ कुटुंबे सध्या वास्तवात आहे. गावाची लोकसख्या ८०५ आहे. यातील सध्या बाहेर शिक्षण घेणारे विद्यार्थी ५० आहे तर ३४ लोक बाहेर नोकरी करणारे आहेत. गावात शाळेत न जाणारे मुले नाहीत. असे असले तरी उच्च शिक्षणाचे प्रमाण मात्र कमी आहे. मागासवर्गीय अनुदानातून स्मशान भूमी जवळ टाकी बांधलेली आहे.

## ग्रामपंचायतीचे आर्थीक उत्पन्न : -

ग्राम प्रशासन चालविण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत विविध कर आकारले जातात तसेच शासकीय अनुदान प्राप्त होते. ते कर खालील प्रमाणे दिले आहेत.

**र : -**

१. जमीन समानीकरण अनुदान- १५ ते १८ हजार रु. मिळतात.
२. कर्मचारी वेतन अनुदान (एक पणीपुरवठा कर्मचारी आहे.)
३. मागासवर्गीय अनुदान यामधुन गरिब मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कपडे दिले जातात. (साधारणपणे ५०१ रू. मिळतात.)
४. सदस्य बैठक भत्ता - ४० रू. मिळतात.
५. शासनामर्फत सरपंच अनुदान वार्षीक १२०० रु. मिळतात त्यात ग्रामपंचायती मार्फत १२०० रू. दिले जातात एकूण २४०० रू. सरपंचांना वार्षीक मानधन दिले जाते.

## पाणी पुरवठा : -

१९९१ मध्ये **प्रा. बी. एस लोखंडे** राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख अधिकारी असतांना त्यांनी गावक-यांच्या मदतीने डोंगरावरुन जे पावसाचे पाणी नाल्याने वाहते तेथे त्या नाल्यावर श्रमदानातुन बंधारा बांधला या बंधा-यात पाणी अडविले जावू लागले. १९९८ मध्ये पाणी पुरवठा योजना मंजूर होण्यासाठी पाण्याचे स्त्रोत म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेने तयार केलेला बंधारा दाखविला गेला व त्यानंतर विहीर मंजूर झ ााली. यानंतर नळ योजनेच्या पाण्याच्या टाकीत पाणी सोडून त्याचा गावाला पाणी पुरवठा करण्यात येवू लागला ही पाण्याची टाकी. १०,००० लिटर क्षमतेची असून गावठाण, तांबेमळा, डेंगळेमळा येथे पाणी पुरवठा केला जातो. सध्या भारत निर्माण पाणी पुरवठा योजना प्रस्तावीत आहे.

## सामाजीक जीवन : -

जाळीची वाडी हा एक निमगाव जाळीचा एक भाग होता. सुरवातीला तळोले कुटुंब शेतात रहावयास आले त्या पाठोपाठ एक एक कुटुंब रहावयास येवून लोकवस्ती तयार झाली आणि जाळीची वाडी पारिसर तयार झाला. व पुढे औरंगपुर स्वतंत्र गाव तयार झाले. सुरवातीला लोक कुडाच्या भिंती असलेले व पाचटाने शेकारलेल्या झोपडीत राहत होते. ही घरे सारविण्यासाठी पांढरी माती गऊळ वाड्यातुन आणली जात असत. जमीन शेणाने सारविली जात होती. हळुहळू पक्की विटाची व दगडाची घरे बांधली गेली. काही ठिकाणी कैलाची घरे, पत्र्याची घरे, व स्लॅपची घरे देखील बांधली असल्याचे दिसते.

## पोषाख पध्दती व अलंकार : -

गावातील लोक साधारणपणे पुरुष नेहरु शर्ट, पयजमा, धोतर, कोपरी, शर्ट पँट वापरतात. हातातील बोटात अंगठी, गळयात लॉकेटख सोनसाखळी वापरतात. लग्नामध्ये चांदीची गदा घातली जाते.

स्त्रिया ६ वार व ९ वार साडी घालतात. चोळी वारतात, तसेच गळयात मंगळसुत्रे घातले जाते. हातात काचेच्या व सोन्याच बांगड्या वापरतात. बोटात आंगठी, कानात कर्णफुले किंवा गोल रिंगा वापरल्या जातात. सणाला नववारी साडी घालतात. गळयात एक दाणी सर घालातात. नाकात नथ वापरली जाते.

**विवाह पध्दती : -**

प्रथम नवरा मुलगा व त्याचे कुटुंबातील लोक मुलगी बघायला जातात. मुलगी पसंत झाल्यास पत्रीका जुळविली जाते. पत्रीका जुळली तर लग्नाची बोलणी केली जाते. सुपारी फोडली जाते, ठिळा लावला जातो. साखरपुडा केला जातो, यानंतर मुलाला व मुलीला लग्नाच्या एक दिवस आगोदर हाळद लावून दुस-या दिवशी लग्न लावले जाते. मुलीच्या घरी लग्न सभारंभ आयोजीत केला जातो. मुलाकडील व-हाडी मंडळी विविध साधनांनी नव-या मुलीच्या गावी जातात. तेथे लग्न लावले जाते. त्यानंतर गृहप्रवेश करुन त्यानंतर सत्यनारायणाचा कार्यक्रम केला जातो. अशा पारंपारीक पध्दतीने विविह केला जातो. गावात लग्नाची अशी काही उदा. आहेत की मुलगी बघायला गेले आणि लग्न लावून मुलगी घेवून आले. अशी या गावात पाच ते सहा विवाह झाले आहेत.

**समाज व्यवस्था : -**

गावातील ९९% लोकांना जमीनी आहेत. त्यांचा उदन निर्वाह शेतीवर चालतो. तसेच गावात शेतकरी, व्यापारी, मजुर, व छोटे व्यावसायीक गावात आहेत.

**गावातील जाती जमाती : -**

औरंगपुर गावामध्ये सहा जातीची एकूण १२१ कुटुंबे राहतात. यात मराठा, सुतार, गोसावी, धनगर, वडार व आदिवासी या जाती आहेत गावातील लोक सामंजस्याने व गुण्यागोविंदाने राहतात. त्यांच्यात कोणताही संघर्ष नाही.

**सांस्कृतीक जीवन : -**

**सण उत्सव : -**

गावातील लोक सण उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे करतात. मकर संक्रात, होळी, पोळा, गुढीपाढवा, नागपंचमी, रक्षाबंधन, दसरा, दिवाळी असे सण साजरे करतात. या व्यतीरीक्त सामुहीकपणे शिवरात्री, शिवपंचमी, हनुमानजयंती, रामनवमी, कृष्णजन्माष्ठमी, गणेश चर्तुथी हे उत्सव साजरे केले जातात. गावाच्या पश्चिमेस चानखन बाबा पिराचे ठाणे आहे. गावातील हिंदू-मुस्लीम लोक मोठ्या श्रेध्देने पुजा करतात.

**यात्रा : -**

गावात बिरोबा, कानीफनाथ, खंडोबा व पर्वतीबाब यांचे एकाच ठिकाणी चार देवळे आहे. होळी नंतर पाच दिवसांनी बिरोबा व कानीफनाथ यांची एकत्रीत यात्रा भरविली जाते. यात्रेत खेळण्या व खाऊची दुकाने येतात. तसेच पुजेचे साहीत्याची दुकानेही असतात. यावेळी फुलवरा नाचतात, भगताच्या अंगात येते. तसेच कुस्त्याचा फड भरविला जातो. देवाला नवस केला जातो. कोंबडे व बोकड कापले जातात. यात्रेमध्ये लोक मोठ्या आनंदाने विविध वस्तुची खरेदी विक्री करत असतात.

**आर्थीक जीवन : -**

गावातील ९९ % लोकांना शेतजमीन आहे. या गावातील मुख्य व्यवसाय शेती व्यवसाय आहे. शेतीमध्ये ज्वारी, बाजरी, गहू, सोयाबीन, हरभरा, कांदा, लसूण, मिरची, बटाटा, मठ, मुग, ऊस, भूईमुग, मेथी, कोथंबीर व करडई ही पिक घेतली जातात. शेती व्यावसायाबरोबरच पशुपालनाचा व्यवसाय येथील शेतकरी करतात. तसेच मेषपालन व कुक्कुटपालन देखील करतात. गावात सहा जातीचे लोक राहतात. मराठा कुटुंबे शेती, मेंढी पालन व कुक्कुटपालन हे व्यवसाय करतात. गोसावी कुटुंबे शेती व पशुपालन करतात. धनगर कुटुंबे शेती, पशुपालन व कुक्कुटपाल, आदिवासी कुटुंबे-शेती, पशुपालन व मजुरी करतात. गोसावी लोक शेती व पशुपालन करतात, वडार शेती व पशुपालन हे व्यवसाय करतात. गावामध्ये दोन दुध डेअ-या आहेत.

गावात विविध व्यावसायीक आहेत, सुतार सुतारकाम करतात. तिन किराणा दुकाने आहे, तिन पिठाच्या गिरण्या आहेत. गावात मेंढी पालन केले जाते. तसेच कुक्कुट पालन करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्रा मार्फत पाणी परिक्षण, माती परिक्षण, हवामान, बाजारभाव, पशुपालन फळबागा व बचतगट या विषयी शेतक-यांना माहीती पुरविली जाते. १९७२ मध्ये खताळ पाटील मंत्री असतांना ९५ हेक्टर क्षेत्रासाठी

शेतजमीनीतील पाणी पुरवठा योजना मंजुर झाली. १९९१ मध्ये **विजय तळोले** हे शेतकरी सावकारी कर्ज बाजारी झाले. तेव्हा त्यांनी आत्महत्या केली होती यावेळी सरकारने त्याची दखल घेतली व या गावात **शरद पवार व गोपीनाथ मुंडे** यांनी भेटी दिल्या. औरंगपुरमध्ये बाजार भरत नसल्याने या गावचे लोक धान्य, भाजीपाला, फळे व इतर वस्तू खरेदी विक्रीसाठी लोणी या गावी जातात.

## धार्मीक जीवन : -






औरंगपुर गावात हिंदू धर्मीय लोक राहतात. येथे मुस्लीम, ख्रिश्चन किंवा बौध्द धर्मीय लोका नाही. गावात हिंदू धर्माची मंदिरे आहेत. गावाच्या पश्चिमेस महादेव मंदिर, उत्तरेस दक्षिण मुखी हनुमान मंदीर गावाच्या मधोमध लक्ष्मी आईचे मंदीर आहे. गावाच्या पूर्व बाजूस एकाच ठिकाणी बिरोबा/कानिफनाथ/खंडोबा व पर्वतीबाबा यांची मंदीरे आहे. होळी नंतर पाच दिवसांनी यात्र भरते. लोक मोठ्या श्रध्देने पुजा आरचा करतात. गावातील आदीवासीचे कृष्णाजी बाबाचे मंदीर आहे. गावाच्या उत्तरेस दिड ते दोन कि. मि. अंतरावर गोरक्षनाथाचा डोंगर असून डोंगरावर शंकराचे मंदीर आहे. तसेच शनी देवाची मुर्ती आहे. येथे सप्ताह भरविला जातो. त्यात गोगलगाव, सादतपुर, लव्हारे, गोरक्षवाडी व औरंगपुर या पाच गावाचे लोक श्रध्देने सहभागी होतात. डोंगरावर शनीचे तळे म्हणून एक टाक आहे त्यात आंघोळ केली तर सर्व रोगराई नष्ट होते. असा गावक-यांचा विश्वास आहे.

## आध्यात्मिक केंद्र :-

गावामध्ये स्वामी समर्थ अध्यात्मीक केंद्र आहे. गावातील लोक या संस्क्रार केंद्रात व स्वामी समर्थाच्या उपदेशाचे वाचन करतात. दुर आंतरावरुन लोक या केंद्राला भेट देतात. त्यामुळे गावातील लोकांत आध्यात्मिक भावना निर्माण झाली आहे. गावातील मद्यपान करीत नाही. गावाच्या उत्तरेस शाळेजवळ चानखण बाबा पिराची समाधी आहे. हिंदू धर्मीय लोकही मोठ्या श्रेध्देने त्याची पुजा करतात. कानीफ नाथ व बिरोबा यांची गावात यात्रा भरते. नवस केले जातात नवस फुडण्यासाठी कोंबडे व बकरे कापले जातात. गावात नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. सर्व समाजाच्या म्हणजे जातीच्या देवीला रोज एक माळ या प्रमाणे चढविल्या जातात.

गावामध्ये **आनंद बाबा झडे** भगत होते. ते गावातील लोकांना अंगारा.धुपारा करुन लोकांच्या समस्यावर इलाज करीत होते. गावाच्या पुर्वेला त्यांची समाधी आहे.

गावात पाणी पाहणाने **नाना बाबुराव तांबे** हे एक प्रसिध्द पान्हाडे होते. आता त्यांचे शिष्य **सखाहरी नाना तळोले** भविष्य सांगतात. गावातील शेतकरी त्यानुसार शेतीचे नियोजन करतात.



गावाच्या पुर्वेला स्मशान भुमी आहे. गावात कोणी मयत झाल्यास त्याला स्मशानात जाळले जाते. त्यासाठी मयताच्या अंतविधीचा बाजार गावातील लोक करतात. मयताना जाळण्यासाठी गावातून लागडे जमा केली जातात. अशा प्रकारचे धार्मीक जीवन औरंगपुर गावात आढळते.

## शेवटी :

## संदर्भ साधने :


1) प्रा. निळे एस. जी. : सर्वेक्षण अहवाल

2) ना. स. इनामदार, झेप कादंबरी, कॉन्टी नेंटल प्रकाशन, पृष्ठ 127,

3) मुलाखती : 1) दशरथ तळोले (सरपंच)

2) विजय डेंगळे (इतिहास अभ्यास)